# प्रेसनोट

जा.क्र. ४६३ /माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०६/२०१७

## ''मोबाईल पोलीस स्टेशन''
## (फिरते पोलीस स्टेशन)

भंडारा:– पोलीस विभाग भंडारा चे वतीने भंडारा जिल्हात पोलीस अधीक्षक,भंडारा श्रीमती विनीता साहू यांचे संकल्पनेतून ''मोबाईल पोलीस स्टेशन'' (फिरते पोलीस स्टेशन) यापुढे भंडारा जिल्हातील सर्व पोलीस स्टेशन अंर्तगत आठवडयाचे प्रत्येक शनिवारी 'मोबाईल पोलीस स्टेशन' ची मोहीम राबविण्यात येत आहे. दिनांक २४/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हातील पोलीस स्टेशन १) पवनी (निलज), २) अडयाळ (सोनेगाव चित), ३) जवाहरनगर (राजेदहेगांव), ४) भंडारा (नवेगाव), ५) मोहाडी (मोरगांव), ६) आंधळगाव (सकरला), ७) तुमसर (उमरवाडा), ८) सिहोरा (सितेपार) ९) साकोली (तुडमापुरी), १०) लाखनी (सोमलवाडा), ११) पालांदुर (जेवनाडा), १२) लाखांदुर (पाऊनगाव), १३) गोबरवाही (पवनारखारी), १४) दिघोरी (चिचाळ), १५) कारधा (गराडा बुज.), १६) वरठी (दाभा), १७) करडी (ढिवरवाडा) या ठिकाणी पोलीस स्टेशनचे अधीकारी व बिट जमादार यांचे मार्फतीने सदर मोहीम राबविण्यात येणार आहे. करीता आजुबाजूचे गावातील/ परीसरातील सर्व नागरिकांनी भेट देवुन त्याचे समस्या बाबत निराकरण करावे. तसेच सदर कार्यक्रमामध्ये गावातील पोलीस पाटील, सरपंच, पोलीस मित्र, माहात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष/ सदस्यगण व सामाजिक कार्यकर्ते हजर राहणार असून नागरीकांनी या मोहिमेत मोठया संख्येने उपस्थित राहून सहभाग घ्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक, भंडारा, श्रीमती विनीता साहू यांनी केले आहे.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९९२३०७७०२२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.